## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी.

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-

माझे नांव : दिव्या केतन काथारा

वय सुमारे : २७ वर्षे

व्यवसाय : गृहिणी.

राहणार : नेवाडे, पनवेल.

**<u>शपथेवर सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती थळकर यांचे मार्फत.</u>**

1. माझे लग्ना अगोदरचे नाव दिव्या विनोद म्हात्रे असे होते. या घ टनेच्यावेळी माझे वय १७ वर्षे होते. माझी जन्मतारीख ३१/०७/१९९८ अशी आहे. सन २०१५ मध्ये मी बेलपाडा येथे राहायला होते आणि ११ वी इयत्तेत शिकत होते.

2. मी आरोपीला शुभम पाटील याला ओळखते. तो माझ्या मैत्रिणीच्या मावशीचा मुलगा आहे. माझे त्या मैत्रिणीचे नाव श्वेता म्हात्रे असे आहे. माझी आरोपीसोबत ओळख झाली होती. आरोपीने मला लग्नासाठी माझ्याकडे प्रपोज केला होता. मी आरोपीशी लग्न करायला तयार होते आणि मी आरोपीला ही गोष्ट सांगितली होती. त्यानंतर मी आणि आरोपी विमला तलाव, उरण आणि जे.एन.पी.टी. टाउनशीप येथे भेटायचो. आरोपी नंतर माझ्याशी लग्न करायला नकार देत होता. सन २०१५ ला माझे आई-वडील, माझे काका, मावशी, मामा, भाउ असे आरोपीच्या घरी लग्नबाबत विचारायला गेले होते आणि आरोपी त्याचे आई-वडील यांना भेटले. त्यावेळी आरोपीने लग्न नाही करणार असे आमच्या लोकांना सांगितले.

3. मी आरोपीने लग्नाला नकार दिल्यामुळे फिनाईल पिले होते. घ रातल्या लोकांना हे माहित झाले आणि मला डॉक्टरांकडे घेउन गेले. मी दवाखान्यात ॲडमीट होते. जेव्हा मी आणि आरोपी भेटायचो तेव्हा आरोपी मला किस करायचा आणि माझ्या बॉडीला टॅच करायचा. मी आरोपीला शारीरिक संबंधसाठी नकार दिला. मी आरोपीला सांगितले

की लग्नानंतर आपण संबंध करू. मी आरोपीला ओळखते. कोर्टात जो आरोपी बसला आहे तो तोच आहे. नंतर मी न्हावाशेवा पोलीस स्टेशनला गेले आणि आरोपीविरूध्द तक्रार दिली होती. आता मला दि. ३०/०८/२०१५ रोजीची फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे ती फिर्याद लिहिली होती. पोलीसांनी मला फिर्याद वाचून दाखविली होती. या फिर्याद मधील मजकूर बरोबर आहे. **फिर्यादीस नि.क्र.पी–१८/सा.क्र.१ देण्यात येते**. पोलीसांनी गुन्हा रजिस्टर केला. आता मला एफ.आय.आर.ची कार्बनकॉपी दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **एफ. आय.आर. ला नि.क्र.पी–१९/सा.क्र.१ देण्यात येते.** मी पोलीसांना घ टनास्थळ दाखविले होते. मी पोलीसांना विमला तलाव आणि जे.एन. पी.टी. टाउनशीप हे ठिकाण दाखविले होते. पोलीसांनी मला मेडीकल तपासणीसाठी उरण सरकारी दवाखान्यात नेले होते. मी पनवेल कोर्टात बयाण दिले होते. आता मला माझ्या नावाचा कलम १६४ सी.आर.पी.सी.चा जबाब दाखविला. त्यावर माझी सही आहे. तो जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आला होता. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **या फिर्यादीच्या १६४ च्या जबाबास नि.क्र. पी–२०/सा.क्र.१ देण्यात येते.**

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. प्रविण ठाकूर यांच्यामार्फत सुरू.</u>**

4. बेलपाडापासहून विमला तलाव आठ ते नउ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की जे.एन.पी.टी आणि सोनारी हे बेलपाडापासून चार ते पाच कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा मी आणि आरोपी फिरायला जायचे त्यावेळी आम्हा दोघांचे वय लग्नाचे झालेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी एकमेकांच्या संमतीने बरोबर फिरायला जायचे. हे म्हणणे खरे

आहे की, फिर्याद देण्याच्या तीन ते चार महिन्यांपुर्वी माझ्या आईवडिलांना माझ्या आणि आरोपींच्या संबंधाबाबत माहिती होते आणि त्यांचा या लग्नाला विरोध होता.

5. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यापुर्वी मी माझ्या आई-वडीलांना आरोपी मला किस करतो, मिठी मारतो याबद्दल सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी कॉलेजमध्ये होती आणि घरच्या आणि कॉलेजच्या लोकांना न सांगता आरोपीसोबत फिरायला जायची. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देतांना मी कोणत्या कोणत्या तारखेला आणि कोणत्या ठिकाणी आरोपीसोबत फिरायला गेली होती हे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या घरच्या लोकांना किंवा कॉलेजच्या लोकांना आरोपीसोबत कोणत्या ठिकाणी फिरायला गेले होते व कोणताही प्रकार घडला होता याबाबत सांगितले नव्हते.

6. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी हा इंजिनिअरींचे शिक्षण घेत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी कधी मोटरसायकलने आणि कधी बसने फिरायला जायचे. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी एकमेकांना मोबाईलवर कोणत्या ठिकाणी जायचे याबाबत मॅसेज करायचे आणि उत्तर द्यायचे. हे म्हणणे खरे आहे की, कधी-कधी आम्ही पी.सी.ओ.ने सुध्दा बोलायचो.

7. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या लोकांनी मला सांगितले की तक्रार द्यायची. हे म्हणणे खरे आहे की, आता माझी आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा माझ्या घरचे लोक आरोपीच्या घरी लग्नासंबंधी बोलायला जायचे त्यावेळी मी त्यांच्यासोबत जात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आणि माझ्या घरच्या लोकांची अशी इच्छा आहे की आम्हाला आता या आरोपीविरूध्द ही केस चालवायची नाही आणि आता आमची त्याच्याविरूध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देतांना माझ्यासोबत माझे आई-वडील, पोलीस पाटील आणि

नातेवाईक होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घरच्यांच्या सांगण्यावरून मी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की जे काही सरतपासात मी सांगितले ते खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्याद चुकीची आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

पनवेल,
दिनांक :०८/०७/२०२६

(एम. बी. ओझा)
विशेष न्यायाधीश, पनवेल,
जिल्हा-रायगड.